कला अकादमी गोवा
पणजी-गोवा
कअ/काविवि/मनास्प/२०२०-२०२१/२७६५
दि.१७/०२/ २०२१

# कृपया प्रसिध्दीसाठी

कला अकादमी आयोजित मराठी 'ब' गट नाटयस्पर्धेला दि.२२ फेब्रुवारी २०२१ रोजी श्री महादेव कला मंच, पालये-पेडणे या संस्थेच्या सत्यवान अ. पालयेकर लिखित **अजिंक्य छावा** या नाटकाच्या सादरीकरणाने प्रारंभ होत असून दि.२३ फेब्रु. रोजी कै. यशवंत नारायण टिपणीस यांच्या लेखणीतून उतरलेल्या **शिक्का-कटयार** या नाटकाचा प्रयोग श्री देवी माऊली कला क्रिडा आणि सांस्कृतिक मंडळ, मेणकुरे-डिचोली या संस्थेतर्फे सादर होणार आहे. श्री भुमिका नाटय मंडळ, पर्ये मठ, साखळी ही संस्था दि.२४ फेब्रु. रोजी निकोलाय व्ही गोगोल यानी लिहिलेले व पु.ल. देशपांडे यांनी अनुवादित केलेले **अमंलदार** हे नाटक सादर करणार आहे. दि.२५ फेब्रु. रोजी साई कल्चरल असोसिएशन, पणजी या संस्थेतर्फे शारदा कुमार शिर्सेकर यांच्या लेखणीतून साकार झालेल्या **शिव आलिंगन** हे नाटक सादर करण्यात येणार आहे. ओम कला सांस्कृतिक केंद्र, हळर्ण-पेडणे या संस्थेच्या वतीने ल. मो. बांदेकर लिखित **आर्य चाणक्य** हे नाटक दि.२ मार्च रोजी होईल. **क्विन्स चेंबर** हे राम कुलकर्णी लिखित नाटक दि.३ मार्च रोजी सुयोग कला मंच, करमळी ही संस्था सादर करेल तर दि.४ मार्च रोजी युवा कला मोगी, फोंडा या संस्थे तर्फे वि. वा. शिरवाडकर यांच्या लेखणीतून साकार झालेले **महंत** हे नाटक सादर होईल. आस्त क्रियेशन, पिळगांव-डिचोली ही संस्था गौतम अनंत गावडे लिखित व किशोर अर्जुन अनुवादित **क्वेशन मार्क** हे नाटक दि.९मार्च रोजी सादर करणार आहे. दि.१० मार्च रोजी सांस्कृतिक कला मंच, सांगे ही संस्था रत्नाकर मतकरी यांच्या **तन-मन** या नाटकाचा प्रयोग सादर करणार आहे.

किर्ती शाम नरसे यांनी लिहिलेले **बट व्हाय?** हे नाटक आर्या कौटिल्य, डोंगरी ही संस्था दि.१२ मार्च रोजी सादर करणार असून दि.१३ मार्च रोजी ॐकार कला आणि क्रिडा संच, उसगांव-फोंडा ही संस्था मामा वरेरकर यांच्या लेखणीतून साकार झालेले व विष्णू सुर्या वाघ यांनी अनुवादित केलेले **करीन ती पूर्व** हे नाटक सादर करणार आहे. दि.१४ मार्च रोजी प्रा. वसंत कानेटकर यांच्या लेखणीतून साकार झालेल्या **इथे ओशाळला मृत्यू** या नाटकाचा प्रयोग मदनंत सावई-वेरे ही संस्था सादर करणार आहे. **आकाशमिठी** हे प्रा. वसंत कानेटकर लिखित नाटक दि.१५ मार्च रोजी नाटयसंपदा-गोवा, नागझर-पेडणे ही संस्था सादर करेल तर दि.१६ मार्च

रोजी स्पर्धेचा समारोप श्री पांडुरंग प्रासादिक नाटय मंडळ, विठ्ठलापुर-साखळी या संस्थेच्या **'ध' चा 'मा'** या पांडुरंग अ. वेलणकर लिखित नाटकाने होणार आहे.

स्पर्धेतील सर्व नाटयप्रयोग रोज सायं.७.०० वाजता रविंद्र भवन, साखळी येथे होणार असून रु.५०/-च्या प्रवेशिका नाटयप्रयोगाच्या ठिकाणी उपलब्ध असतील याची संबंधितानी नोंद घ्यावी असे कला अकादमीने कळवले आहे.

(डॉ.दत्तगुरु आमोणकर)
कार्यक्रम व विकास अधिकारी

प्रति
१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड

७.गोवन वार्ता, तिसरा मजला, फोर्थ इस्टेट(कामत मेट्रोपॉलीस),सांतईनेज,पणजी

८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)

पीजी/एसएस